## प्रकरण चौथे

## रोजगारविषयक माहिती

- स्त्री शेतमजूरांना काम कसे मिळते
- स्त्री शेतमजूराकडून केली जाणारी कामे
- शक्यतो टाळली जाणारी कामे व त्याची कारणे
- विश्रांतीची वेळ
- कामाचे तास
- वेतनमान
- कामाची वार्षिक हंगामानुसार विभागणी
- सोयी सवलती
- बेरोजगारीच्या काळाचा वापर

.....

# प्रकरण चौथे

## रोजगार विषयक माहिती

### कृषी रोजगार:

रोजगार म्हणजे ज्याना काम करण्याची इच्छा व शक्ती आहे. अशांना मोबदल्याच्या बदल्यात काम मिळणे होय. म्हणजे विनावेतन केलेल्या कामाचा समावेश रोजगारीत केला जात नाही.

जी व्यक्ती शेतमजूराच्या कुटुंबात शेतमजूर म्हणून रहात आहे व तिला वेतन किंवा मोबदल्याच्या बदल्यात काम मिळते. त्याला रोजगार मिळाला असे म्हणता येईल. ज्या दिवशी शेतमजूराला काम मिळाले व ते मोबदल्याच्या बदल्यात त्याने केले तो रोजगारीचा दिवस धरला जातो.[१]

### कृषी रोजगारीची वैशिष्टये:

उद्योगाचे मानाने शेतीतील रोजगार वैशिष्टयपूर्ण आहे. इतर उद्योग निवडक असतात. जेवढया लोकांची आवश्यकता असते तेवढेच लोक निवडले जातात. शेतीमध्ये आवश्यकतेपेक्षा जास्त लोक असतात. त्यांना नाकारले जात नाही. तसेच त्यांची निवडही केली जात नाही.

शेतीतील रोजगारीचे प्रमुख लक्षण म्हणजे त्याचे हंगामी स्वरुप.[२] कामाच्या ऐन सुगीत शेतमजुरांना अधिकात अधिक रोजगार मिळतो. पण इतर वेळात त्यांना रोजगारीसाठी इतर मार्ग शोधावे लागतात. अशावेळी त्यांना रोजगारीही अत्यंत कमी असते. म्हणजेच त्यांना बेकार रहावे लागते किंवा अर्धबेकार रहावे लागते.

### स्त्री शेतमजूरांच्या रोजगारीचे स्वरुप:

स्त्री शेतमजूरांना ब-याच ठिकाणी प्रासंगिक मजूर म्हणून काम

करावे लागते. मळणी करणे, रोपे लावणे, खुरपणे, मशागत करणे, भांगलणे अशा स्वरुपाची कामे त्यांना करावी लागतात. खुदाईच्या कामात स्त्री शेतमजूर पुरूषांना मदत करण्याचे काम करतात.

स्त्रियांना शेतकीची कामे करावी न लागणे हे काही प्रमाणात कुटुंबाच्या भरभराटीचे निदर्शक मानले जाते. ज्या स्त्रियांना कुटुंबाच्या अर्थार्जनात सहभागी होण्याची गरज भासत नाही व शेतीतील श्रमाऐवजी घरी असून घरगुती कामे करावी लागतात. त्यांना सामाजिक प्रतिष्ठा प्राप्त होते. शेतीव्यवसायाशी निगडीत असणारी कामे उदा. धान्य वाळविणे, बी-बीयाणे स्वच्छ करणे, भात सडणे इ. कामे स्त्रियांनाच करावी लागतात.

स्त्री शेतमजूरांचा पुरवठा खालील कारणामुळे मोठ्या प्रमाणात नियंत्रित केला जातो.[3]

१) स्त्रियांना हलक्या कामात गुंतविले जाते.

२) शेतकीसाठी हंगामात आवश्यक वेळी स्त्री शेतमजूरांचा भरपूर पुरवठा होतो. तसाच तो बिगर हंगामात जरुरी नसल्यामुळे कमीही करता येतो.

३) शेतकी किंवा बिगर शेतकीची कामे करण्यासाठी स्त्री शेतमजूर दूरवर स्थलांतर करीत नाहीत. गावातच जे काम मिळेल व जितके दिवस मिळेल तसे स्वीकारतात.

४) स्त्री मजुरांच्या पुरवठ्यावर नियंत्रण ठेवणारा महत्त्वाचा घटक म्हणजे सामाजिक भावना व जाती पध्दती. या घटकांचा प्रभाव मुख्यत्वेकरुन शेतकऱ्यांच्या कुटुंबातील मजुरांवर होतो. कारण शेतमजूरी करणाऱ्या स्त्रिया मुख्यत्वेकरुन मागासलेल्या व अनुसूचित जातीतल्या असतात आणि त्यानी घराबाहेरची कामे करु नयेत अशी भावना असते. या वर्गातूनच स्त्री शेतमजुरांचा पुरवठा मोठ्या प्रमाणात होतो.

कुटुंबाच्या मिळकतीत हातभार लावण्याच्या दृष्टीने व केवळ गरज म्हणून त्या स्त्रिया काम करतात.

स्त्रियांना शारीरिक श्रम करायला न लावणे हे सामाजिक व आर्थिक प्रतिष्ठेचे लक्षण मानले जाते. ग्रामीण समाजातील उच्चस्तरातील मंडळीकडूनही स्त्रियांच्या घराबाहेरील कामाला विरोध दर्शविला जातो.

स्त्री शेतमजूर रोजगारी:

शेतीक्षेत्रात शेतीतील सर्व प्रकारची कामे करण्यात स्त्रीयांचा सहभाग मोठा असतो. पेरणी भांगलणी, कापणी, मळणी, खुरपणी, बांध घालणे, ऊस लावण, इ. प्रकारची कामे खेड्यातील स्त्री शेतमजूराकडून केली जातात.

खालील कोष्टकात स्त्रियांच्या रोजगारीतील १९०१ ते १९७१ या कालावधीतील प्रवाह नमूद केले आहेत.

कोष्टक क्र. ४.१

भारतातील स्त्रियांच्या रोजगारीतील प्रवाह

.....

## कोष्टक क्र.४.१

## भारतातील स्त्रियांच्या रोजगारीतील प्रवाह

| वर्ष | एकूण लो.संख्येशी स्त्रीलोकसंख्येचे प्रमाण. | स्त्रियांच्या एकूण लोक संख्येशी स्त्रीमजुरांचे असणारे प्रमाण | स्त्री मजुरांची टक्केवारी प्रमाण प्राथमिक क्षेत्रा | | १००० पुरुषा मजुरांशी स्त्री मजुरांचे प्रमाणे | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | शेतकरी शे.मजूर | पशु. पालन | शेतकरी शे.मजूर | पशु पालन |
| १९०१ | ४९.३ | ३१.७ | ७९.३५ | ७४.४६ | ५४८ | ५३४ |
| १९११ | ४९.१ | ३३.७ | ७३.९१ | ७७.१४ | ५६७ | ५५० |
| १९२१ | ४८.१ | ३२.७ | ७५.५२ | ७८.८० | ५५७ | ५४५ |
| १९३१ | ४८.९ | २७.६ | ७२.२८ | ७६.२३ | ४७६ | ४६६ |
| १९६१ | ४८.५ | २८.० | ७९.५८ | ८१.५८ | ५६५ | ५५२ |
| १९७१ | ४८.७ | २९.२ | ७९.८८ | ८१.७८ | ५७५ | ५५२ |

आधार: डॉ. लीला पाटील - पीएच्.डी. प्रबंध, १९७८.
"भुदरगड तालुक्यातील शेतमजुरांचा सामाजिक आर्थिक अभ्यास"
पान नं. १०४.

कोष्टक क्र. ४.१ वरून १९०१ ते १९७१ या काळात काही वर्ष वगळता स्त्रीमजुरांचे शेतकरी व शेतमजूर म्हणून काम करण्याचे प्रमाण वाढलेले आहे. त्याचप्रमाणे दर १००० पुरुषामागे स्त्री मजुरांचे शेतीतील प्रमाण १९०१ मध्ये ५४८ होते. ते १९७१ मध्ये ५७५ इतके झाले. प्राथमिक क्षेत्रात याच कालावधीत ते अनुक्रमे ५३४ ते ५५२ असे वाढले.

## शेतमजूरांच्या रोजगार भरतीचे स्वरुप:

शेतमजूरांच्या भरतीचे स्वरुप औद्योगिक कामगार वा मजूरांपेक्षा वेगळे असते. शेतमजूर खेड्यापाड्यात विखुरलेले असतात. त्यामुळे शेतमजूरांचा पुरवठा होण्याचे प्रमुख केंद्र खेडे असते. या क्षेत्रात मध्यस्थांचा भाग महत्त्वाचा नसतो. त्यामुळे शेतमजूरांना प्रत्यक्षपणे कामावर घेतले जाते.

शेतकरी ज्या दिवशी शेतमजूरांची गरज आहे त्याच्या आदल्या दिवशी शेतमजूरांची गाठ घेवून दुसरे दिवसापासून आपल्या शेतावर कामास येणेबाबत सांगतो. कामाच्या ऐन हंगामात शेतमजूरांना अधिक प्रलोभने देवून आवश्यक ती मजूरसंख्या मिळविली जाते. ब-याचवेळा शेतमजूर खेड्यातील ठराविक भागात रहात असल्यामुळे त्यांची गाठ घेणे कठीण जात नाही.

मजूरांची गुलाम म्हणून वापर करण्याची पध्दती सध्या अभावानेच आढळते. स्वतंत्र मजूर एखाद्या मालकाचे काम, कामाच्या अटी वा मजूरी मान्य वा अमान्य करु शकतो. पण खेड्यातील शेतमजूर या अर्थाने संपूर्ण स्वतंत्र नाहीत कारण ते मजुरीचा दर मान्य किंवा अमान्य करु शकत नाहीत. याचे कारण पर्यायी व्यवसायाचा कृषी अथवा बिगर कृषी क्षेत्रात अभाव हे होय. शेतमजूरीशिवाय अन्य पर्यायी व्यवसायाची निवड करण्यात ते असमर्थ असतात. आर्थिक जबाबदारी-तून काम करण्याची निकड कामाच्या संधीचा अभाव, निरक्षरता, आपले गाव न सोडण्याची प्रवृत्ती यामुळे मजुरांना कामात निवड करण्यास वाव उरत नाही.

प्रस्तुत प्रकरणामध्ये अभ्यासविषयासाठी निवडलेल्या क्षेत्रातील स्त्री शेतमजूरांच्या मुलाखाती घेऊन भरलेल्या प्रश्नावलीच्या आधारे विश्लेषण केले आहे. यामध्ये प्रामुख्याने खालील उपघटकांचा समावेश केलेला आहे. या मुलाखतीचा संदर्भ काळ ऑक्टोबर/नोव्हेंबर, १९९१ आहे.

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR

१) रोजगार मिळण्याची पध्दत

२) स्त्री शेतमजूरांकडून केली जाणारी कामे

३) स्त्री शेतमजूरांकडून टाळली जाणारी कामे व त्याची कारणे

४) कामाचे तास व त्यांच्या वेळा

५) विश्रांतीची वेळ

६) कामाचे हंगामी स्वरूप

७) वेतन निश्चिती

८) वेतनावर प्रभाव टाकणारे घटक

९) कोणत्या हंगामात जास्त वेतनदर मिळतो

१०) कामाच्या ठिकाणी मालकाकडून मिळणाऱ्या सोयी सवलती

११) कामासाठी रोज सरासरी चालावे लागणारे अंतर

१२) जेव्हा काम मिळत नाही तेव्हा काय केले जाते. याची माहिती.

१) <u>रोजगार मिळण्याची पध्दती:</u>

अभ्यासक्षेत्रातील गावामध्ये निवडलेल्या स्त्री शेतमजूरांना प्रश्नावलीच्या आधारे रोजगार मिळणाऱ्या पध्दतींची माहिती घेतली.

रोजगार कसा मिळतो किंवा काम कसे मिळते याविषयी जवळ-जवळ सात आठ पर्याय ठेवले होते ते खालीलप्रमाणे —

१) शेतमालकांना घरी जावून रोज भेटावे लागते

२) शेतमालकांना आठवड्यातून एकदा घरी भेटावे लागते

३) शेतमालकांना आठवड्यातून दोनदा घरी भेटावे लागते

४) शेतमालक रोज घरी येवून भेटतात

५) रोज गावातल्या ठराविक ठिकाणी कामगार एकत्र येतात व त्याठिकाणी सर्व शेत मालक एकत्र येवून रोजगार ठरतो.

६) दीर्घ मुदतीच्या करारानुसार.

याठिकाणी विचारलेल्या वरील सात-आठ पर्यायापैकी सर्व स्त्री शेत-मजुरांनी दोनच पर्याय सांगितले ते म्हणजे शेतमालकांना घरी जावून भेटावे लागते किंवा शेतमालक घरी येवून भेटतात.

खालील कोष्टकावरुन रोजगार मिळण्याच्या पध्दतीची माहिती होते —

कोष्टक क्र. ४.२

रोजगार मिळवण्याची पध्दत

| अ.नं. | रोजगार मिळण्याची पध्दत | संख्या | प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | मालक मजुरांच्या घरी येवून सांगतात | ५० | ४७.६२ |
| २. | मजूर मालकांच्या घरी जावून भेटतात | ५५ | ५२.३८ |
| | | १०५ | १००.०० |

वरील कोष्टकावरुन असे दिसून येते की, १०५ स्त्री शेतमजूरापैकी ५० (४७.६२ टक्के) इतक्या शेतमजूरांनी मालक घरी येवून सांगतात असे सांगितले तर ५५ (५२.३८ टक्के) स्त्री शेतमजूरांनी मालकांच्या घरी जावून भेटावे लागते असे सांगितले.

कामाचे स्वरुप:

अभ्यास क्षेत्रातील गावामध्ये निवडलेल्या १०५ स्त्री शेतमजूरांना प्रामुख्याने त्या कोणती कामे करतात याविषयी माहिती विचारली.

त्यांच्याकडून केली जाणारी कामे म्हणजे भांगलणी, ऊसाची लावण, द्राक्ष बागेतील xxxxx सर्व कामे, खुरपणी, खत टाकणे, तण काढणे, खोडणे

वेचणे, ऊसाचा पाला काढणे. याशिवाय खोडणी, पेरणी, मळणी, टोचणी व इतर अनेक कामे त्या करतात.

निवडलेल्या क्षेत्रातील स्त्री शेतमजूरांच्या कामाच्या स्वरूपाबाबत एक वैशिष्टय दिसून आले ते म्हणजे जवळ जवळ ८५ :/ स्त्रिया द्राक्षे बागेतील कामे करतात.

कोष्टक क्र. ४.३ वरून स्त्री शेतमजूरांच्या कामाचे स्वरूप स्पष्ट होते.

कोष्टक क्र.४.३

स्त्री शेतमजूरांच्या कामाचे स्वरूप

| अ.नं. | कामाचे स्वरूप | संख्या | प्रमाण |
|---|---|---|---|
| १) | भागलण | ९९ | ९४.२८ |
| २) | ऊस लावण | ५० | ४७.६१ |
| ३) | द्राक्ष बागेत काम | ८८ | ८३.८० |
| ४) | शेतीतील इतर सर्व कामे | ४३ | ४०.९५ |
| | एकूण .. | २८० | |

कोष्टक क्र.४.३ वरून असे दिसून येते की, सर्व प्रकारचे काम करतो, अशा प्रतिसादांची संख्या २८० आहे. कारण एकच स्त्री एकापेक्षा जास्त प्रकारची कामे करते. उदा. ज्याप्रमाणे काम मिळेल त्याप्रमाणे भागलण, द्राक्ष बागेत इ. म्हणून एकूण बेरीज १०५ पेक्षा जास्त आली आहे.

## स्त्री शेतमजूरांकडून टाळली जाणारी कामे:

निवडलेल्या क्षेत्रातील व निवडलेल्या स्त्री शेतमजूरांना त्या प्रामुख्याने कोणती कामे टाळतात याविषयी विचारले असता त्यानी खालील

प्रकारची उत्तरे दिली. उदा. ऊसाला पाणी पाजणे, ऊस तोड, खड्डे काढणे, ताल घालणे, औत धरणे.

ही कामे त्यांच्याकडून टाळली जाण्याची किंवा न केली जाण्याची कारणे म्हणजे परंपरेने ती कामे पुरुष शेतमजूरच करतात. खड्डे काढणे. ताल घालणे विहीर बांधकाम इ. कामे न करण्यामध्ये काही प्रमाणात शारीरिक दुर्बलता हे कारण आहे.

खालील कोष्टकावरुन स्त्री शेतमजूर कोणती कामे टाळतात ते दिसून येते —

कोष्टक क्र.४.४

स्त्री शेतमजूरांकडून टाळली जाणारी कामे

| अ.नं. | कामाचा प्रकार | संख्या | प्रमाण |
| --- | --- | --- | --- |
| १) | विहीर बांधकाम | ९९ | ९४.२८ |
| २) | ऊसाला पाणी पाजणे | १०२ | ९७.१४ |
| ३) | ऊस तोड | ८० | ७६.१९ |
| ४) | खड्डे काढणे | ९६ | ९१.४२ |
| ५) | इतर | ७५ | ७१.४२ |

कोष्टक क्र. ४.४ मध्ये कामाच्या प्रकारानुसार स्त्री शेतमजूरांची संख्या १०५ पेक्षा जास्त आली आहे. कारण एकच स्त्री एकापेक्षा अधिक प्रकारची कामे करण्याचे टाळते.

कामाचे तास व कामाच्या वेळा:

स्त्री शेतमजूरांचे कामाचे तास मोजत असताना ते नेमके कोणते मोजावयाचे हाही प्रश्न उद्भवतो कारण स्त्री शेतमजूर घरातून बाहेर पडल्यापासून कामाच्या ठिकाणी पोहचेपर्यंत सरासरीने एक तास लागतो. तसेच घरी परतण्यासाठीही तितकाच वेळ जातो. तेव्हा प्रत्यक्ष कामाचे तास मोजावयाचे की घरातून बाहेर पडल्यापासून घरी पोहचेपर्यंतच्या वेळेचा समावेश कामाच्या तासामध्ये करावयाचा हा प्रश्न निर्माण होतो. याठिकाणी फक्त प्रत्यक्ष कामाचे तास गृहीत धरलेले आहेत.

४ तासाच्या कामासाठी महिलांना १२ रुपये तर पुरुषांना १४ रुपये तर सात तास म्हणजे दोन वेळच्या कामासाठी स्त्रियांना १६ रुपये व पुरुषांना १८ रुपये वेतनदार आहे. या कामाच्या वेळा ८ ते २ (मध्ये एक तास सुट्टी) एक वेळ कामासाठी तर दोन वेळच्या कामासाठी ८ ते २ मध्ये १ तास सुट्टी व त्यानंतर ३ ते ५ अशा वेळा गावातील विठ्ठल संयुक्त सह. शेती संस्था याठिकाणी असल्याचेदिसून आले.

गावात इतरत्र कामाचे तास व वेळा यापेक्षा थोडया भिन्न असल्याचे दिसते. स्त्री शेतमजूर सकाळी आठ ते साडे आठला बाहेर पडतात व अडीच अडीच तीनच्या दरम्यान घरी येतात. यापैकी पाच तास प्रत्यक्ष कामाचे असतात. (९ ते २.३० मध्ये अर्धा तास जेवणाची सुट्टी असते.)

दोन वेळच्या कामासाठी ९ ते ५ अशी वेळ असून सकाळी ९ ते २ मध्ये २ ते ३ सुट्टी व ३ ते ५ अशा प्रकारची दोन वेळच्या कामाची वेळ असते.

थोडक्यात कामाच्या वेळेची विभागणी दोन विभागात केली जाते. सकाळी ९ ते २.३० पर्यंतचे काम हे एकवेळचे काम मानले जाते तर दुपारी ३ ते ५ हे दुसऱ्या वेळचे काम मानले जाते व या कामासाठी वेगळी मजुरी दिली जाते.

कामाच्या बाबतीत शेतीक्षेत्रामध्ये वेळ ठरवून दिली जात नाही. म्हणजेच ऐकाच वेळी सर्व शेतमजूरांनी कामाला सुरुवात करावयाची व एकाच वेळी सर्वांनी काम बंद करावयाचे असा कुठलाही नियम दिसून येत नाही. कामाची वेळ ब-याच वेळा ही जमीनमालकांच्या मर्जीनुसार ठरविली जाते. प्रत्येक शेतमालक आपल्या सोयीनुसार शेतमजूराकडून काम करुन घेतो. एखादा जमीन मालकाकडे एखादा दिवस जास्त काम असेल तर तो मजुरी वाढवून देऊन जास्त वेळ काम करवून घेतो. तरीसुध्दा सर्वसाधारण वेळा ठरलेल्या असतातच.

विश्रांतीच्या वेळा:

विश्रांतीची वेळ शेतमालकानुसार भिन्न भिन्न असल्याचे दिसते. तरीपण सामान्यपणे ९ ते २.५० या एकवेळच्या कामासाठी ११ ते ११.३० अशी अर्धा तास सुट्टी असते. ही वेळ ठाठर स्वरुपाची नाही. काही शेतकरी अर्धा तासापेक्षा अधिक तर [illegible] काही शेतक-यांकडे अर्धा तासापेक्षा कमी वेळ सुट्टी देतात. दोन वेळच्या कामासाठी वरील अर्धा तास अधिक एक वेळचे काम संपल्यानंतर मध्ये एक तास सुट्टी असते.

थोडक्यात विश्रातीच्या वेळा व कालावधी शेतमालक ठरवितात. त्यामुळे भिन्न भिन्न असल्याचे दिसते.

कोणत्या हंगामात जास्त काम मिळते:

म्हैसाळ गावात शेतीला बारमाई पाण्याची सोय असल्याने वर्षभर काम उपलब्ध असते. मात्र प्रामुख्याने जुलैमध्ये व द्राक्ष हंगामात काम जास्त मिळते.

स्त्री शेतमजूरांचे वेतनमान:

स्त्री शेतमजूरांचे वेतन कसे ठरते याविषयी खालील प्रश्न विचारले

१) किमान वेतन कायद्याच्या तरतुदीनुसार

२) शेतमालकांची मागणी व शेतमजूरांचा पुरवठा लक्षात घेवून रोज कमी जास्त केले जाते.

३) कामाचे स्वरुप लक्षात घेवून शेतमजूर ठरवितो

४) सर्व शेतमजूर एकत्र येवून ठरवितात

५) सर्व शेतमालक एकत्र येवून ठरवितात

६) इतर पध्दती

निवडलेल्या शेतमजूर स्त्रियांना वरीलप्रमाणे प्रश्न विचारले परंतु सर्वच्या सर्व १०५ स्त्री शेतमजूर स्त्रियांनी वेतन कायम एकच असून एकवेळच्या कामासाठी सर्वत्र व सर्व हंगामात फक्त १० रुपयेच मिळतात असे सांगितले.

वेतनावर प्रभाव पाडणारे घटक या विषयी खालील प्रश्न विचारले -

१) वेतन हंगामाप्रमाणे बदलते का ? जवळ जवळ सर्व स्त्रीयांनी या प्रश्नाचे उत्तर नाही असेच दिले.

२) वेतनावर शहरी वेतनाचा प्रभाव पडतो का असे विचारले असता ९५ टक्के स्त्रियानी नाही असेच उत्तर दिले.

३) लिंगभेदानुसार वेतनभिन्नता असून १०० टक्के स्त्रियांनी स्त्री-पुरुष वेतनात तफावत असते असे सांगितले. तसेच सर्व शेतमालकाकडून सारखाच वेतनदर मिळतो. शेतमालाकाच्या आर्थिक दर्जाचा परिणाम शेत-मजूरांच्या वेतनावर झालेला दिसून येत नाही. तसेच बालमजूरांनाही स्त्री व पुरुष शेतमजूरांपेक्षा कमी वेतन दिले जाते.

<u>किमान वेतन कायद्याचे अज्ञान:</u>

निवडलेल्या १०५ स्त्रीयांपैकी ९० टक्के स्त्रियांनी किमान वेतन कायदा म्हणजे काय हे माहित नसल्याचे सांगितले.

वेतनभिन्नता:

सर्वसाधारणपणे संघटित क्षेत्रामध्ये एकाच कामासाठी दिल्या जाणाऱ्या वेतनात भिन्नता आढळून येत नाही. स्त्री-पुरूष कामगारांना एकच वेतनदर असतो. याउलट असंघटीत क्षेत्रात मात्र वेतनात भिन्नता आढळून येते. एकाच कामासाठी वेगवेगळ्या मात्रेत वेतन दिले जाते.

कामाच्या वेळेनुसार वेतनभिन्नता:

कामाच्या वेळेची विभागणी एक वेळचे काम व दोन्ही वेळाचे काम अशा दोन विभागात केलेली आहे व त्यावरून वेतनामध्येही कमी अधिक अशी भिन्नता आढळून येते. अर्थातच जादा कामाला जादा वेतन ही गोष्ट योग्यच आहे. पण कामाच्या बाबतीत शेती क्षेत्रात वेळ ठरवून दिली जात नाही ही फार मोठी उणीव आहे.

लिंगभेदानुसार वेतनभिन्नता:

स्त्री, पुरूष व मुले यांच्यासाठी वेतनाची एकच पातळी कुठल्याच गावात आढळून येत नाही. एकाच प्रकारच्या कामासाठी स्त्री-पुरूष शेतमजूरांना वेगवेगळा वेतनदर दिला जातो. ९० टक्के स्त्रियांना समान कामासाठी समान वेतन हे तत्व माहित नाही.

समान कामासाठी स्त्रियांना पुरूषापेक्षा कमी वेतन देत असल्यासत्या का स्वीकारतात याची कारण विचारली असता स्त्रीचे समाजातील दुय्यम स्थान, परंपरा काम न मिळण्याची भिती, संघटना नाही, सर्वत्र दिले जाते, अशा प्रकारची कारणे सांगितली गेली.

कोष्टक क्र. ४.५ वरून वेतनदर कमी असण्याची कारणे व त्याचे प्रमाण कळून येते.

कोष्टक ४.५

स्त्री शेतमजूरांना कमी वेतन मिळण्याची कारणे

| अ.नं. | कारण | संख्या | प्रमाण |
|---|---|---|---|
| १) | काम न मिळण्याची भिती | ५९ | ५६.१९ |
| २) | सर्वत्र दिले जाते | २२ | २०.९५ |
| ३) | आर्थिक परिस्थिती | २० | १९.०४ |
| ४) | इतर कारणे | २३ | २१.९० |
| | एकूण .. | १२४ | ११८.०८ |

कोष्टक क्र.४.५ वरून असे दिसून येते की, स्त्री शेतमजूरांना पुरूषापेक्षा कमी वेतन मिळण्याची जी वेगवेगळी कारणे आहेत त्यामध्ये काम न मिळण्याची भिती हे कारण शेकडा ५६.१९ स्त्रियांनी सांगितले.

याठिकाणी वेगवेगळी कारणे देणाऱ्या स्त्री शेतमजूरांची संख्या १०५ पेक्षा अधिक (१२४) आहे. कारण एका स्त्रीने एकापेक्षा जास्त कारणे सांगितली.

कामाची उपलब्धता:

स्त्री शेतमजूरांना उन्हाळा (मार्च ते जून) पावसाळा (जुलै ते ऑक्टोबर) व हिवाळा नोव्हेंबर ते फेब्रुवारी यापैकी कोणत्या हंगामात जास्त काम मिळते याची विचारणा केली असता त्यांनी दिलेल्या उत्तराचे स्वरूप खालील कोष्टक क्र. ४.६ वरून लक्षात येते.

कोष्टक क्र. ४.६

वार्षिक रोजगारीचा अंदाज

| अ.नं. | कामगार प्रकार | उन्हाळा | पावसाळा | हिवाळा | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| १) | पुरुष | ८३ | ८१ | ९५ | २५९ |
| २) | स्त्री | ६७ | ६७ | ६६ | २०० |

कोष्टक क्र.४.६ वरुन असे दिसून येते की, पुरुष शेतमजूरांना स्त्री शेतमजूरांपेक्षा सरासरीने जास्त दिवस रोजगार मिळतो व विशेषतः हिवाळ्या-मध्ये सर्वात जास्त रोजगार मिळतो. तर स्त्री शेतमजूरांना साधारणपणे सर्व हंगामात सारख्या प्रमाणात रोजगार मिळतो. पुरुषांना वर्षात एकूण २५९ दिवस रोजगार मिळतो. तर स्त्रियांना वर्षात २०० दिवस रोजगार मिळतो. तर स्त्रियांना वर्षात २०० दिवस रोजगार मिळतो याचाच अर्थ पुरुष शेत-मजुरांना स्त्री शेतमजुरापेक्षा अधिक दिवस रोजगार मिळतो.

सोयी सवलती:

कामाच्या ठिकाणी स्त्री शेतमजूरांना विशेष सोयी सवलती मिळत नाहीत. पिण्याचे पाणी, जेवणासाठी निवाऱ्याची जागा, विश्रांतीसाठी/मुलांच्या निवाऱ्यासाठी जागा इ. सोयी मिळतात का अशी विचारणा केली असता बहुतेक स्त्रियांनी फक्त पिण्याचे पाणी मिळते असे सांगितले

कोष्टक क्र. ४.७ वरुन शेतमजूरांना मिळणाऱ्या सोयी सवलतींचे स्वरुप स्पष्ट होते.

कोष्टक क्र. ४.७

स्त्री शेतमजूरांना मिळणाऱ्या सोयी सवलती

| अ.नं. | मिळणाऱ्या सोयी | संख्या | प्रमाण |
|---|---|---|---|
| १) | पिण्याचे पाणी | १०० | ९५.२४ |
| २) | जेवणासाठी निवाऱ्याची सोय | ५ | ४.७६ |
| ३) | विश्रांतीसाठी जागा | ४ | ३.८० |
| | एकूण .. | १०९ | |

कोष्टक क्र.४.७ वरून असे दिसून येते की सर्वात जास्त (९५.२४ टक्के) शेतमजूरानी पिण्याच्या पाण्याची सोय केली जाते असे सांगितले. याशिवाय जेवणासाठी निवाऱ्याची सोय, विश्रांतीसाठी जागा इ. सुविधा क्वचितच दिल्या जातात. याठिकाणी स्त्री शेतमजूरांची संख्या १०९ येण्याचे कारण एकच स्त्रीने एकापेक्षा जास्त सुविधा मिळत असल्याचे सांगितले.

वस्तु स्वरूपातील मोबदला:

पैशातील वेतनव्यतिरिक्त वस्तू स्वरूपात उदा. जनावरांना चारा, भाजीपाला, जळण व इतर काही मोबदला वस्तूरूपात मिळतो का याविषयी [illegible] निवडलेल्या शेतमजूरांना विचारणा केली असता त्यानी दिलेल्या उत्तरांचे स्वरूप खालील कोष्टक क्र.४.८ वरून लक्षात येते.

कोष्टक क्र.४६८

पैशातील वेतनाखेरीज मिळणारा मोबदला (वस्तु स्वरूपात)

| अ.नं. | मिळणाऱ्या वस्तू | संख्या | प्रमाण |
|---|---|---|---|
| १) | जनावरांना चारा | ७७ | ७३.३३ |
| २) | भाजीपाला | २६ | २४.७६ |
| ३) | जळण | ५१ | ४८.५७ |
| ४) | इतर | १८ | १७.१४ |
| ५) | काही नाही | १५ | १४.२८ |

शेतमजुरांना वेतनाखेरीज जनावरांना चारा, भाजीपाला, जळण इ. सुविधाही मिळतात असे कोष्टक क्र.४.८ वरून लक्षात येते. ७७ स्त्रियांनी (७३.३३ %) जनावरांना चारा मिळतो असे सांगितले. यांही ठिकाणी एकूण बेरीज १०५ पेक्षा जास्त येण्याचे कारण काही स्त्रियांना एकापेक्षा अधिक सुविधा मिळत असल्याचे सांगितले.

जेंव्हा काम मिळत नाही तेव्हा काय केले जाते:

कोष्टक क्र.४.६ वरून स्त्री शेतमजूर व पुरूष शेतमजूर यांना मिळणाऱ्या रोजगार दिवसाची कल्पना येते. स्त्री शेतमजूरांना तसेच पुरूष शेतमजूरांना वर्षभर शेतीत रोजगार मिळत नाही. अशावेळी हे शेतमजूर काय करतात याविषयी माहिती घेतली असता खालील स्वरूपाची माहिती मिळाली.

शेतीकामाशिवाय खुदाई, भुईमुगाच्या शेंगा फोडणे, धान्य निवडणे, विहीर खणणे इ. कामे केली जातात. खुदाई, बांध घालणे, ही कामे पुरूष शेतमजूर करतात व इतर सर्व कामे स्त्री शेतमजूर करतात. याशिवाय काही दिवस दोघांनाही बेकार रहावे लागते.

......

## प्रकरण चौथे

### संदर्भ ग्रंथ


१) प्रा.डॉ. लीला पाटील : शिवाजी विद्यापीठ पीएच्.डी. प्रबंध मार्च १९७८, भुदरगड तालुक्यातील शेतमजुरांचा सामाजिक आर्थिक अभ्यास पान नं.१३.

२) प्रा.सौ. शांता पाटील डॉ. लीला पाटील : कृषि अर्थशास्त्राची मूलतत्वे महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथ निर्मिती मंडळ, नागपूर, १९८०. शेतीतील श्रम पान नं. ३२४.

३) प्रा.डॉ. लीला पाटील : शिवाजी विद्यापीठ पीएच्.डी. प्रबंध १९७८, भुदरगड तालुक्यातील शेतमजुरांचा सामाजिक आर्थिक अभ्यास, पान नं.१०७.


.......